संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com




● वर्ष : ७ वे ● ● अंक : १०० वा ● ● सोमवार दि. १९ फेब्रुवारी २०२४ ● ● किंमत २ रू ● पाने : ४ ●RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

## नेते,उद्योगपतींनंतर आता ईडी व्यापाऱ्यांना छळणार : अॅड. प्रकाश आंबेडकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**वर्धा :** नेते, उद्योगपतींनंतर आता ईडी व्यापाऱ्यांना छळणार असल्याने व्यापाऱ्यांनी सावध रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. प्रकाश आंबेडकर यांनी केले. ते वर्धा येथे आयोजित सभेत बोलत होते. ड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, राजकीय नेते, उद्योगपती यांच्यावर विविध कारवाया झाल्या, त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. राजकीय नेते नाईलाज म्हणून भाजपात गेले. कारण, त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबास तुरुंगात टाकण्याची धमकी देण्यात आली होती. कुटुंबाचा छळ होऊ नये म्हणून या नेत्यांना पक्ष सोडावा लागला. आता व्यापारी वर्गावर ही वेळ येणार आहे. कारण, एखाद्यास मानवी रक्ताची चटक लागली की तो कोणालाच सोडत नाही. उद्योगपती, नेते यांच्यासाठी तुम्ही-आम्ही होतो. पण व्यापारी वर्गाच्या बचावसाठी जनताच राहणार नाही. मोदी पुन्हा सत्तेवर येऊ नये म्हणून तुम्ही विरोधात मतदान केले पाहिजे, असे आवाहन आंबेडकर यांनी केले.


प्रकाश आंबेडकर

दिल्लीत आंदोलन करताना कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप झाला. मात्र ए. राजा, कानिमोझी हे न्यायालयात निर्दोष सुटले. कारण न्यायालयात पुरावेच सादर झाले नाही. न्यायाधीश म्हणाले होते की, मी रोज पुरावे सादर करण्याची वाट पाहात होतो. पण ते न आल्याने निर्दोष सोडावे लागले. हा निर्णय २०१६ मध्ये आला. त्यावेळी मोदी सरकार होते. 'ना खाऊंगा, ना खाणे दूंगा' म्हणणाऱ्याने पुरावे का सादर केले नाहीत, याचे उत्तर दिले पाहिजे, असे आवाहन ड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

सध्या शेतकरी, कामगार, बेरोजगार यांच्यावर चर्चाच होत नाही. हे 'आम' जनतेचे सरकार नाही. ३७० कलम रद्द झाल्याचा आनंद व्यक्त होतो. पण अद्याप जम्मू काश्मीरमध्ये निवडणुका का नाही, याचे उत्तर भाजपाने दिले पाहिजे. तेथील वर्तमान स्थिती लपून ठेवल्या जात आहे. विश्वगुरू होण्याआधी गल्लीगुरू होऊन दाखवावे, असा टोला त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लगावला. जाती-धर्मास प्राधान्य देऊ नका, आपल्याला संविधान वाचवायचे असल्याने मतदान विचारपूर्वक करा, असे आवाहनही ड. प्रकाश आंबेडकर यांनी केले. व्यासपीठावर वंचित नेत्यांसह महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते.

## मुक्तेश्वर माडगुळकर यांची बदली

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मुक्तेश्वर माडगुळकर यांची बदली झाली आहे. सार्वत्रिक लोकसभा निवडणुका २०२४ च्या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, महाराष्ट्र विकास सेवा मधील सहाय्क्क गट विकास अधिकारी गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत यामध्ये मुक्तेश्वर माडगुळकर यांची बदली सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील खटाव पंचायत येथे झाली आहे.


मुक्तेश्वर माडगुळकर

आटपाडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज भोसले यांची बदली झाल्यावर मुक्तेश्वर माडगुळकर यांनी आटपाडी पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी म्हणून नियुक्ती झाली होती. आटपाडी पंचायत समिती येथे रुजू झाल्यावर त्यांनी पंचायत समिती कर्मचारी शिस्तीसोबतच कामकाजाला गती दिली होती. जिल्हामध्ये पंचायत समितीचे काम दुसऱ्या क्रमांकावर आले होते.

रोजगार हमी कामाला गती देण्याबरोबरच त्यांनी घरकुल योजनेसाठी प्रभावीपणे काम केले. सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक तक्रारींचे निराकारण करत त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. कामाध्ये अचूकता ठेवत अनेक कामाच्या फाईली त्यांनी मार्गी लावत विकास कामांना गती दिली. त्यांच्या बदलीचे आदेश प्राप्त झाले असून त्यांच्या रिक्त जागी अद्याप कोणाचीही नेमणूक झाली नाही.

## निंबवडे शाळेचा खो-खो संघ जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र


आटपाडी : जि.प. शाळा निंबवडे नं. १ चा जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झालेल्या संघा बरोबर उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत मोठ्या गटात जि. प. शाळा नं. १ मॉडेल स्कूल निंबवडे शाळेने चमकदार कामगिरी करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला. सांगली जिल्हा स्पर्धेमध्ये आटपाडी तालुक्याचे नेतृत्व निंबवडे नं, १ शाळा करणार आहे.

सामना पाहण्यासाठी आटपाडी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय मोरे, मयूर लाडे, शिक्षणविस्ताराधिकारी जगन्नाथ कोळपे, निंबवडे केंद्राचे केंद्रप्रमुख यशवंत गोडसे, त्याचबरोबर निंबवडे शाळेचे मुख्याध्यापक मारुती देवडकर, तसेच निंबवडे गावातील नागरिकही उपस्थित होते.

निंबवडे गावचे सरपंच बाळासाहेब मोटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समाधान पाटील, शाळा नं. २ चे मुख्याध्यापक भरत कदम व त्यांचा सर्व शिक्षक स्टाफ यांनी खेळाडूंचे व शाळेचे अभिनंदन केले असून अधिकारी वर्ग, पालक यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सदर खेळाडूंना शाळेचे कला, सांस्कृतिक, व क्रीडा प्रमुख महेश इंगवले यांच्यासह शाळेतील शिक्षक रतिलाल गळवे, कृष्णदेव पिंजारी, अमोल मिसाळ, गणेश नेहरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## बेदाण्याच्या शालेय आहारात समावेशाच्या शासन अध्यादेशाने 'स्वाभिमानीची' लोकसभेला प्रचारात आघाडी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/धिरज प्रक्षाळे :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख माजी खासदार राजू शेट्टी यांनी राज्यातील लोकसभेच्या सहा जागा लढविण्याची घोषणा केली असून कोणाही बरोबर आघाडी करणार नसल्याने त्यांनी सध्या तरी स्पष्ट केले आहे. या सहा जागामध्ये सांगलीचा समावेश असून या ठिकाणी जिल्हाध्यक्ष महेश खराडे हे पक्षाचे प्रमुख उमेदवार आहेत. मतदार संघातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रामध्ये भेट देवून ते शेतकऱ्यांच्या बांधा पर्यंत पोहचले आहेत. परंतु त्यांच्या या प्रयत्नाला मोठी ताकद म्हणजे त्यांनी बेदाण्याचा शालेय आहारात समावेश करण्याची केलेली मागणी अन त्याचा शालेय शिक्षण आहारात झालेला समावेश त्याचा निघालेला शासकीय अध्यादेश. त्यामुळे सध्या तरी स्वाभिमानीने प्रचारात आघाडी घेतली आहे.

सांगली लोकसभा हा काँग्रेसचा बालेकिल्ला रहिला आहे. परंतु २०१४ च्या मोदी लाटेत प्रथमच काँग्रेसचा बालेकिल्ला प्रथमच ढासळला. वसंतदादांचे नातू व तत्कालीन मंत्री असलले प्रतीक पाटील यांना पराभव स्विकारावा लागला. २०१९ निवडणुकीमध्ये काँग्रेसची जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला सोडण्यात आली. परंतु या ठिकाणी वसंतदादा पाटील यांचे दुसते नातू विशाल पाटील यांनी राजू शेट्टी यांनी उमेदवारी दिली. त्यांनी खासदार संजयकाका पाटील यांना जोरदार टक्कर दिली. या ठिकाणी त्यांनी तब्बल तीन लाख ४४ हजार मतदान त्यांनी घेतले होते.

परंतु आता पुलाखालून पाणी गेले आहे. स्वाभिमानीने या ठिकाणी लोकसभेला कोणासोबत आघाडी व युती करणार नसल्याचे स्पष्ट केल्याने या ठिकाणी जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. त्यांनी जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघनिहाय सभा व बैठका यांना जोर लावला असून त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.


महेश खराडे

त्यांनी शेतकऱ्यांच्यासाठी केलेल्या आंदोलनामुळे त्याचा मोठा आर्थिक फायदा शेतकरी वर्गाला होत आहे. जिल्ह्यात ऊसदर वाढ व्हावी यासाठी संघटनेने केलेले आंदोलन व जिल्ह्यातील प्रमुख असलेल्या राजारामबापू साखर कारखान्याच्या गव्हाणीत मारलेल्या उड्या यामुळे जिल्हातील ऊसदाराची कोंडी फुटली व शेतकऱ्यांना याचा मोठा आर्थिक लाभ झाला.


त्याचप्रमाणे जिल्हापासून एका टोकाला असणाऱ्या आटपाडी तालुक्यातील राजेवाडीच्या सद्गुरू साखर कारखान्यावर शेतकऱ्यांच्यासाठी आंदोलन करत कारखाना बंद पाडत शेतकऱ्यांच्या ऊसाला दरवाढ करून दिली. त्यामुळे आटपाडी तालुक्यातील शेतकरी वर्गामध्ये समाधान व्यक्त होत आहे. जिल्हातील संकटात सापडलेल्या द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांच्या बेदाण्यासाठी आग्रही भूमिका घेत बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करण्यासाठी वेळोवेळी केलेली आंदोलने व त्याचा झालेला समावेश यामुळे जिल्ह्यातील द्राक्ष बागायत शेतकरी वर्गाला याचा मोठा आर्थिक लाभ मिळणार आहे. उस व दूध दर, द्राक्ष, बेदाणा कर्जमाफी, दिवसा वीज आदी प्रश्नावर सुरू असलेला संघर्ष घराघरापर्यंत पोहचवून महेश खराडे यांनी निवडणुकीचे रणशिंग फुंकले असून ही निवडणूक ते , 'एक वोट, एक नोट' या तत्वावर लढविणार असून याला सध्या तरी मोठा प्रतिसाद मिळत असून महेश खराडे यांनी सध्या तरी प्रचारात आघाडी घेतली आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान होणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा महाराष्ट्र भूषण पुरस्कारयेत्या गुरूवारी दिनांक २२ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. तर मानाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून अनेक वर्ष योगदान देत रसिकांची व कलासृष्टीची सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा राजकपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

वरळी येथील डोम, एनएससीआय (नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया) येथे गुरुवारी सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या ५७ व्या राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्यात हे पुरस्कार मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात करण्यात येतील. या समारंभास केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तरविधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तसेच या कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधीही उपस्थित राहणार आहेत.


अशोक सराफ

नुकताच ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना २०२३ साठीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. राजकपूर जीवनगौरव पुरस्कार सन २०२० साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती अरुणा इराणी, सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती हेलन यांना जाहीर झाला आहे तर राजकपूर विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी ज्येष्ठ दिग्दर्शक जे. पी. दत्ता, सन २०२१ साठी ख्यातनाम गायक सोनू निगम आणि सन २०२२ साठी विधू विनोद चोप्रा यांना जाहीर झाला आहे. या समारंभात त्यांना सन्मानपूर्वक हे पुरस्कार प्रदान केले जातील.

ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार सन २०२० साठी ख्यातनाम चित्रपट अभिनेते स्व. रवींद्र महाजनी (मरणोत्तर), सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा चव्हाण आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा नाईक यांना जाहीर झाला आहे. यासोबतच चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी चित्रपट दिग्दर्शक गजेंद्र अहिरे, सन २०२१ साठी ज्येष्ठ पार्श्वगायक रवींद्र साठे आणि सन २०२२ साठी प्रसिद्ध चित्रपट अभिनेते-दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना जाहीर झाला आहे. या राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्याच्या समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.




## शरद पवारांच्या याचिकेवर आज सुनावणी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाला खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अशी मान्यता देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात ज्येष्ठ नेते शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. यावर सोमवारी सुनावणीसाठी सूचिबद्ध करण्यात आली आहे. न्या. सूर्य कांत, न्या. दीपंकर दत्त आणि न्या. के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होईल. अजित पवार गट पक्षादेश जारी करण्याची शक्यता असल्याने तातडीने सुनावणी घेण्याची विनंती शुक्रवारी करण्यात


शरद पवार

आली होती. सर्वोच्च न्यायालयाने ती मान्य केली. निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे चिन्ह अजित पवार यांच्या गटाला बहाल करण्याचा निर्णय दिला होता. तर विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीही अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गट हीच खरी राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचा निर्णय दिला होता.

## केजरीवालांनी 'ईडी'चे सहावे समन्स नाकारले

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री आणि 'आप'चे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) बजावलेले समन्स नाकारले. दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणी त्यांनी बजावलेले हे सहावे समन्स आहे. दरम्यान, आम आदमी पार्टीने स्पष्ट केले आहे की, 'ईडी'च्या समन्सच्या वैधतेचे प्रकरण आता न्यायालयात पोहोचले आहे. समन्सबाबत 'ईडी'ही न्यायालयात गेली आहे. आता 'ईडी'ला न्यायालयाच्या निर्णयाची वाट लागणार आहे.

## रजनी सातव यांचे निधन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नांदेड :** माजी मंत्री रजनी सातव यांचे निधन झाले. वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. नांदेड येथील खासगी रुग्णायलात त्यांच्यावर उपचार सुरु होते. रविवारी (दि.१८) प्रकृती अस्वस्थ असल्याने नांदेड येथील रुग्णालयात त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी कळमनुरी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. रजनी सातव या दिवंगत खासदार राजीव सातव यांच्या आई आणि विधानपरिषद आमदार प्रज्ञा सातव यांच्या त्या सासू आहेत. रजनी सातव यांनी राज्याचे आरोग्य आणि समाजकल्याण राज्यमंत्रिपद भूषविले होते. त्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा देखील होत्या.


रजनी सातव

राज्यमंत्री राहिलेल्या रजनी सातव यांनी एकदा विधानसभेत तर एकदा विधानपरिषदेतून नेतृत्व केलं होतं. काँग्रेसच्या प्रदेश संघटनेतही त्या अनेक वर्ष सक्रिय होत्या. सातव कुटुंबिय गेल्या ४३ वर्षांपासून काँग्रेस पक्षात सक्रिय आहे. सध्या त्यांची सून आमदार आहे. गांधी घरण्याचे निकटवर्तीय, अशी सातव कुटुंबियांची ओळख आहे.



# संपादकीय

## छत्रपती शिवाजीराजे हे मराठा साम्राज्याचे संस्थापक

आपल्या पराक्रम, कुशल बुद्धिमत्ता, मुत्सद्दी राजकारण आणि सामाजिक धोरण यांच्या बळावर परकीयांच्या मनातही राजा असावा तर असा हा लोभ निर्माण करणाऱ्या अखंड महाराष्ट्राचे दैवत स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची आज जयंती. शिवाजीसारखा राजा जर आमच्या भूमीत जन्माला आला असता तर ही पृथ्वीच काय तर परग्रहावरही आमचे निर्माण झाले असते असे लॉर्ड एल्फिस्टन यांनी तर इंग्लंडचे ग्रँड डफ यांनी राजे केवळ लढवय्ये नव्हते तर सामाजिक आणि अर्थकारण यांची उत्तम जाण असणारे राजकारणी पुरुष होते. हतबल झालेल्या बहुजनांना त्यांच्या चाणाक्ष योजनेमुळे सत्ताधीश होता आले. असे लिहिले आहे.

शिवाजी महाराज श्रीमंत तर होतेच; पण योगीही होते.दक्षता, कणखरता आणि तत्परता असा स्थायीभाव असलेल्या शिवछत्रपतींच्या शब्दकोशात आळस नव्हता, उत्साह होता, चंचलता नव्हती, निग्रह होता, मोह नव्हता, ममता होती, भोगवाद नव्हता, त्यागवाद होता. जगातील थोर पराक्रमी आणि मुत्सद्दी राजांची यादी जर समोर धरली, तर छत्रपती शिवाजी महाराजांची बरोबरी करणारा मोहरा सापडणे दुर्मिळ आहे. छत्रपती शिवाजी महाराज आपले आहेत म्हणून त्यांना श्रेष्ठ ठरवायचे नसून ते एक ऐतिहासिक सत्य आहे. मोगल सत्तेने जिकडे तिकडे आपला अंमल बसवला होता व स्त्रियांची अब्रू लुटण्याचा प्रसंग केव्हा येईल, याचा नेम नव्हता. अशा धामधुमीच्या काळामध्ये महाराजांचा जन्म झाला होता. राजांनी हे चित्र स्वराज्यात संपूर्ण बदलून टाकले होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाहीविरुद्ध आणि मोगल साम्राज्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य शिवाजी राजांनी उभे केले आणि इ.स. १६७४ मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या २,००० सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा 'शिवजयंती' म्हणून साजरा होतो.

ज्या काळात मुघलांचे राज्य शिखरावर होते त्या काळात शिवरायांनी आपल्या मातृभूमीवर आपले स्वतःचे, जिजाऊंच्या स्वप्नातील आणि रयतेच्या मनातील निरंकुश स्वराज्य उभे केले.'त्या राजाची जयंती जगात सर्वप्रथम १८६९ ला क्रांतीबा ज्योतिबा फुलेंनी साजरी केली ! जाणता राजास मानाचा मुजरा

# स्ट्रॉबेरी पिकासाठी अनुदान देण्यासाठी शासन प्रयत्नशील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सातारा :** महाबळेश्वर तालुक्यात मोठ्या प्रमाणात स्ट्रॉबेरी उत्पन्न घेतले जाते. यावरच येथील शेतकऱ्यांचे अर्थकारण अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी स्ट्रॉबेरी पिकाला शासन अनुदान देण्यासाठी प्रयत्नशील असून याबाबत जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार मकरंद पाटील यांच्याशी चर्चा केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

पाचगणी येथील बिलीमोरिया शाळेच्या सभागृहात स्ट्रॉबेरी विथ सीएम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार मकरंद पाटील,मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, टाईम महाराष्ट्रचे मुख्य संपादक राजेश कोचेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे आदी उपस्थित होते.


एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, शेतकऱ्यांनी आता पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड दिली पाहिजे. शेत पिकावर प्रक्रिया उद्योग उभारल्यास शेतकऱ्यांना त्याचा अधिक फायदा होईल. यादृष्टीने शेतीमध्ये गुंतवणूक वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शेतीमधून आर्थिक उत्पन्न वाढावे म्हणून मागेल त्याला शेततळे, ठिबक सिंचन, एक रुपयात पीक विमा अशा अनेक योजना राज्य शासन राबवीत आहेत. त्याचबरोबर अतिवृष्टीत बाधित शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या निकषापेक्षा दुपटीने आर्थिक मदत करण्याचा निर्णयही शासनाने घेतला.

शेती करीत असताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, हे शासन सर्वसामान्यांचे, शेतकऱ्यांचे असल्याने या घटकांच्या विकासासाठी आवश्यक सर्व बाबी केल्या जातील.

पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी सर्वांनी झाडे लावली पाहिजेत व त्याचे संवर्धनही केले पाहिजे. महाबळेश्वर व जावळी हे डोंगरी तालुके आहेत. येथील नागरिक कामासाठी मुंबई येथे जातात.ते पुन्हा गावात यावेत, नोकरीच्या शोधार्थ शहरात जाणाऱ्यांना स्थानिक पातळीवरच रोजगार उपलब्ध व्हावेत यासाठी पर्यटन वाढी बरोबर रोजगार निर्मितीवर भर देत आहोत. येथील शेतकऱ्यांनी बांबू लागवडीकडे वळावे. बांबू नगदी पीक असून बांबूपासून फर्निचर,इथेनॉल निर्मिती करता येते. बांबू लागवडीसाठी शासन अनुदान देत असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. स्ट्रॉबेरीपासून वाईन निर्मितीचा प्रकल्पही महाबळेश्वर येथे उभारण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास महाबळेश्वर तालुक्यातील स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक आरोग्य विभागाची विशेष मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राष्ट्रीय अंधत्व व दृष्टी क्षिणता नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत दि. १९ फेब्रुवारी ते ४ मार्च २०२४ दरम्यान राज्यभरात विशेष मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम राबविण्यात येणार आहे. या कालावधीत १ लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट आरोग्य विभागाने ठेवले आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

शासकीय रुग्णालय, मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्था रुग्णालय येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जाणार असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.

या मोहिमेंतर्गत १ लाख शस्त्रक्रिया करण्यासाठी आरोग्य विभागाने जिल्हानिहाय नियोजन केले असून संबंधित आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. केंद्र शासनामार्फत 'राष्ट्रीय नेत्र ज्योती अभियान' ही विशेष मोहीम जून, २०२२ पासून राबविण्यात येत आहे. या मोहिमेत ५० किंवा त्याहून अधिक वयाच्या लोकांमध्ये अंधत्व आणि एसव्हीआय कारणीभूत असलेल्या मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा अनुशेष पूर्णपणे भरून काढण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत २०२२ ते २०२५ या तीन वर्षात २३ लाख मोतीबिंदू शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट आहे. आरोग्य विभागाच्या या मोहिमेमुळे नागरिकांना मोफत शस्त्रक्रियेचा लाभ घेता येणार आहे.

सन २०२२-२३ मध्ये राज्यात मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे ११२.५१ टक्के उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे व २०२३-२४ या आर्थिक वर्षात डिसेंबर, २०२३ पर्यंत एकूण उद्दिष्टाच्या ६७.३० टक्के मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता दि. १९ फेब्रुवारी ते दि.०४ मार्च २०२४ या कालावधीत जिल्हास्तरावर 'विशेष मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम राबविण्यात येणार आहे. या उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासकीय आरोग्य संस्थांसह, अशासकीय स्वंयसेवी संस्था तसेच खासगी संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार आहे.

याविषयी किंवा इतर आरोग्यविषयक सल्ला घेण्यासाठी नागरिकांनी १०४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# पेटीएमची सेवा सुरुच राहणार

**क्यूआर कोड, साऊंड बॉक्स आणि कार्ड मशिनचा वापर कायम करता येणार**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** पेटीएम पेमेंट्स बँकेवर कारवाई केल्यानंतर पेटीएमवरून पैसे ट्रान्सफर करता येणार का किंवा त्याची सेवा सुरू राहणार का असे एक ना अनेक प्रश्न ग्राहकांना पडले आहेत. त्यावर आता आरबीआयने त्यांच्या प्रश्नोत्तरांमधून स्पष्टीकरण दिलं आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने स्पष्ट केले आहे की कंपनीचा क्यूआर कोड, साउंड बॉक्स आणि कार्ड मशीन कोणत्याही समस्येशिवाय काम करत राहतील.

पेटीएम पेमेंट्स बँकेवर आरबीआयच्या कारवाईनंतर पेटीएमच्या या सेवांबाबत बाजारात अफवा पसरल्या होत्या. पेटीएमची मूळ कंपनी वन ९७ कम्युनिकेशन्सने व्यापाऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी त्यांचे नोडल खाते क्सिस बँकेला दिले आहे. यासाठी एस्क्रो खाते उघडले जाईल. वन ९७ कम्युनिकेशन्सची उपकंपनी पेटीएम पेमेंट सर्व्हिसेस (पीपीएसएल) आधीच क्सिस बँकेसोबत काम करत होती. फिनटेक कंपनीने आपल्या एक्सचेंज फाइलिंगमध्ये म्हटले आहे की व्यापाऱ्यांचे QR कोड, साउंड बॉक्स आणि कार्ड मशीन कोणत्याही व्यत्ययाशिवाय कार्यरत राहतील. व्यापारी सेटलमेंटमध्ये कोणतीही अडचण येणार नाही याची खात्री करण्यासाठी क्सिस बँकेशी करार करण्यात आला आहे.

# राजकारणासाठी व्यक्तिगत नाते तोडू नये : जयंत पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**लातूर :** गेल्या काही वर्षांत राज्यात काका-पुतण्यांचं राजकारण अवघ्या महाराष्ट्राने पाहिलं. अजित पवारांनी राष्ट्रवादीत बंड केल्यानंतर या काका-पुतण्याच्या राजकारणाची चर्चा चालू झाली. यावरूनच, शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी यावरून टीका केली आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या पुतळ्याच्या अनावरणाच्या कार्यक्रमात बोलत होते.


लातूर : माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या पुतळ्याच्या अनावरणाच्या कार्यक्रमात बोलताना जयंत पाटील

एळाद्यावर संताप व्यक्त करण्यासाठी खालच्या दर्जाला राजकारण गेलं आहे. त्यामुळे आता कुठेतरी थांबलेलं बरं असं अनेकांना वाटतं. किती गुंडगिरी महाराष्ट्रातील राजकारणात शिरते आहे, याची अनेक उदाहारणं गेल्या काही महिन्यांत दिसायला लागली आहेत. माझी लातूरकरांना विनंती आहे की, या लातूरने महाराष्ट्रातील काँग्रेसला सतत तेज देण्याचं काम केलं आहे. काँग्रेस महाराष्ट्रात ठामपणे अस्तित्वात आहे, हे अनेकवेळा या लातूरने सिद्ध करून दाखवलं आहे. लातूरकरांवर ही जबाबदारी आहे की आपल्या महाराष्ट्रात ज्या संस्कृतीत वाढलो, जी संस्कृती विलास देशमुखांनी दाखवली, ती संस्कृती लोप पावत आहे. या लोप पावणाऱ्या या संस्कृतीला टिकवण्याचं काम लातूरकरांचं आहे, असं भावनिक आवाहन जयंत पाटलांनी केलं.

काँग्रेसचं बरं आहे काका-पुतण्याचं नातं धार्जिणं दिसत आहे. दिलीप देशमुख उत्तमपणाने नेतृत्त्व करत आहेत. अमित यांच्यासह सर्वांचे संबंध मधूर आहेत. राजकारणात कसंही कोणी वागलं तरी चालतं. पण राजकारणासाठी व्यक्तिगत नातं तोडण्याची भूमिका कोणी घेता कामा नये. आता त्याही गोष्टी व्हायला लागल्या आहेत, असा अप्रत्यक्ष टोलाही त्यांनी लगावला. काँग्रेसमधील दिलीप देशमुखांच्या मागे सक्षम आणि खंबीरपणाने राहणारा नेता अमित देशमुखांच्या रुपाने भेटला आहे. पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांच्या पीढीच्या नंतरची पिढी म्हणून सतेज पाटील आहेत, असंही जयंत पाटील म्हणाले.

# सांगलीत सीआयडीच्या नावाने डॉक्टरला १९ लाखांचा गंडा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** अनोळखी नंबरवरून फोनद्वारे सीआयडीकडून बोलत असल्याचे भासवून सांगलीतील एका डॉक्टरांची १९ लाखाला ऑनलाईन लूट करण्याचा प्रकार घडल्याची माहिती रविवारी मिळाली. याबाबत विश्रामबाग पोलीस ठाण्यात अज्ञाताविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी, डॉ. निकेत शहा यांना दि. ३ ते ९ फेब्रुवारी दरम्यान दोन वेगवेगळ्या नंबरच्या भ्रमणध्वनीवरून अज्ञाताने संपर्क साधला. तुम्ही चीनला पाठविलेल्या कुरियरमध्ये १० बनावट पारपत्र, व्हीसा, लॅपटॉप व चीनचे चलन आहे. हे सर्व बेकायदेशीर असून तुमच्या भ्रमणध्वनीवर स्काईप अॅप घेण्यास भाग पाडले. या अॅपद्वारे बँक खात्याची माहिती मिळवली.

यानंतर अज्ञाताने अंधेरी पोलीस ठाणे व मुंबई सीआयडीकडून चौकशी केली जाईल असे सांगत सीआयडीच्या नावाने बँक खात्यावरील काही रक्कम पंजाब नॅशनल व इंडिसंड बँकेच्या खात्यावर वर्ग करून घेतले. तर काही रक्कम आरटीजीएस करण्यास भाग पाडले. अर्ध्या तासात पडताळणी करून पैसे परत करण्यात येतील असे सांगून १९ लाख ७ हजार रूपयांचा गंडा घातला आहे.

# ओबीसीतूनच आरक्षण हवं

**मनोज जरांगे पाटील : सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी झाली नाही तर..**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी आंदोलन करत आहेत. त्यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषण सुरु केलं आहे. तसंच आम्हाला ओबीसीतूनच आरक्षण हवं या मागणीवर ते ठाम आहेत. सगे सोयरेंच्या अध्यादेशाची अमलबजावणी झाली नाही तर आम्ही २१ तारखेला आम्ही आंदोलनाची दिशा ठरवू असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

मनोज जरांगे यांच्या बेमुदत उपोषणाचा आजचा नववा दिवस आहे. डॉक्टरांच्या पथकाने काल सकाळी मनोज जरांगेंची आरोग्य तपासणी केली. यावेळी पथकाने त्यांचा बीपी, शुगर आणि इतर तपासण्या केल्या. जरांगे यांनी आरोग्य पथकाला तपासणीसाठी सहकार्य केले असून त्यांची प्रकृती आता सुधारत असल्याचे यावेळी डॉक्टरांनी सांगितले.

यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, आमचं मूळ म्हणणं हेच आहे की ओबीसीतून आरक्षण पाहिजे आणि सगेसोयरे अंमलबजावणी झालीच पाहिजे या मागणीवर आम्ही ठाम आहोत. ५० टक्क्यांच्या आत आरक्षण येऊच शकत नाही. ६२ टक्के आरक्षण आधीच दिलं आहे. आता किती टक्के देतात ते पाहू. पुन्हा एकदा चॅलेंजचा विषय येऊ शकतोच असंही जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. दिलेलं आरक्षण रद्द झालं तर आम्हाला आंदोलन करावंच लागणार आहे. आम्हाला कुणबी प्रमाणपत्र हवं आहे. तसंच आम्ही ओबीसीच आहोत, सगेसोयरे अमलबजावणीही करुन हवीच आहे. साडेतीन महिन्यांपासून काम सुरु आहे. प्रक्रिया साडेतीन महिन्यांपासून सुरु आहे. कोट्यवधी मराठ्यांचा हा विषय आहे असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले आहेत. जर २० तारखेला ते मिळालं नाही तर २१ तारखेला पत्रकार परिषद घेणार आणि पुढची दिशा ठरवणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.


मनोज जरांगे पाटील

# मुस्लिमांनो घाबरु नका, अन्याय होणार नाही : अजित पवार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

**मुंबई :** मुस्लिम समाज देशाचा भाग असून, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात या समाजाचेही मोठे योगदान आहे. सध्या काही जण मुस्लिम समाजात 'भीती निर्माण करून राजकारण करीत आहेत. पण मुस्लिम समाजाने काळजी करण्याचे कारण नाही. राज्यात सर्व समाज सुरक्षित राहतील, याची काळजी घेतली जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी केले.




राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) अल्पसंख्याक विभागातर्फे रविवारी वाशीतील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये शिक्षण, आरक्षण व संरक्षणाच्या प्रश्नावर राज्यस्तरीय अल्पसंख्याक विश्वास मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते यावेळी पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर, माजी आमदार बाबा सिद्दिकी, अल्पसंख्याक निरीक्षक नजीब मुल्ला, राज्यप्रमुख इद्रिस नायकवडी, राज्य कार्याध्यक्ष वसीम बुन्हाण आदी उपस्थित होते.

यावेळी अजित पवार म्हणाले, आर्थिक कारणांमुळे अल्पसंख्याक समाजात अनेक मुली उच्चशिक्षण घेत नाहीत. पण शासनाने आता आठ लाखांच्या आत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील मुलींना उच्चशिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. याचा लाभ सर्वच जातीधर्मातील मुलींना मिळणार आहे. अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी गतवर्षी शासनाने ५०० कोटी दिले होते. यंदा १५०० कोटी रुपये देण्याचा प्रयत्न आहे. तसेच नांदेड, मालेगाव, छत्रपती संभाजीनगर, मुंबई येथे उर्दू हाऊस सुरू करण्याचा मानस असल्याचे सांगितले.







दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
माणदेश एक्सप्रेस

डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स्
Email - netra7676@gmail.com
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११



# पॅराग्लायडींग साहसी खेळाची जागतिक स्पर्धा घेणार : एकनाथ शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सातारा :** पॅराग्लायडींग या साहसी व आव्हानात्मक खेळाची जागतिक स्पर्धा घेतली जाईल. या स्पर्धेसाठी शासन सर्वतोपरी मदत करेल,अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. टाईम महाराष्ट्र आयोजित पॅराग्लायडींग प्री वर्ल्ड कप स्पर्धा-२०२४ बक्षीस वितरण प्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार मकरंद पाटील,मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, टाईम महाराष्ट्रचे मुख्य संपादक राजेश कोचेकर आदी उपस्थित होते.



**सातारा : टाईम महाराष्ट्र आयोजित पॅराग्लायडींग प्री वर्ल्ड कप स्पर्धा-२०२४ बक्षीस वितरण प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंचावर उपस्थित मान्यवर**

पॅराग्लायडींग करणे हे साहसी व आव्हानात्मक असून जमिनीवर उतरणे तितकेच महत्त्वाचे आहे. दऱ्या खोऱ्यांनी व निसर्गसंपदेने नटलेल्या व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत या स्पर्धेचे चांगले आयोजन केले आहे.पॅराग्लायडींग या खेळाची जागतिक स्तरावरील स्पर्धा लवकरच महाराष्ट्रात घेतली जाईल, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती यानिमित्ताने त्यांनीजनतेला शुभेच्छादिल्या.या कार्यक्रमास विविध संस्थांचे पदाधिकारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पलुसमध्ये जेष्ठ नागरिकांना वॉकरचे वाटप

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पलुस :** रामानंदनगर येथे क्रांती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड यांच्या वाढदिवसाच्या निमत्ताने 'शरद आत्मनिर्भर' अभियाना मार्फत रामानंदनगर ज्येष्ठ व गरजू नागरिकांना स्टिक आणि वॉकरचे चे वाटप करण्यात आले.



**पलुस : रामानंदनगर येथे जेष्ठ व गरजू नागरिकांना स्टिक आणि वॉकरचे चे वाटप करताना उपस्थित मान्यवर**

डिजिटल फलक लावण्यापेक्षा गरजू लोक आहेत त्यांना जीवनावश्य गोष्टीचे वाटप करावे असे आवाहन शरद लाड यांनी केले होते. या आवाहनानुसार रामानंदनगर येथील गरजू व जेष्ठ नागरीक यांना स्टिक आणि वॉकरचे चे वाटप करण्यात आले. यावेळी 'शरद आत्मनिर्भर' अभियान चे अध्यक्ष दिपक मदने, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट रामानंदनगर शहर अध्यक्ष कृष्णा मिठारी, संदीप वाघमारे संचालक क्रांती ऊस उत्पादक तोडणी व वाहतुक सहकारी संस्था, संदीप चव्हाण, अक्षय पवार, पृथ्वीराज तुपे, अन्सार शिकलगार, अशिफ नदाफ, तल्लेरखान पठाण व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो' ला विद्यार्थी आणि उद्योजकांनी भेट द्यावी : उद्योगमंत्री उदय सामंत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सक्षम करणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या पहिल्या 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो' ला महाविद्यालयीन विद्यार्थी, उद्योजक आणि नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले.

इंटरनॅशनल एक्झिबिशन ण्ड कन्व्हेनशन सेंटर, मोशी येथे 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो'च्या पूर्वतयारीची श्री. सामंत यांनी पहाणी केली. यावेळी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पीएमआरडीएचे आयुक्त राहुल महिवाल, गणेश निबे, किशोर धारिया, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता प्रकाश चव्हाण, नितीन वानखेडे आदी उपस्थित होते. श्री. सामंत म्हणाले, मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे २४ फेब्रुवारी पासून सुरू होणाऱ्या या प्रदर्शनात भारतीय नौसेना, लष्कर आणि वायुसेना या तिन्ही सुरक्षा दलांचा महत्वाचा सहभाग आहे. प्रदर्शनातील विविध सत्रात भारताची संरक्षण सिद्धता, विविध शस्त्रास्त्रांची निर्मिती, संरक्षण क्षेत्रातील संधी याविषयी विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती मिळणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना शास्त्रास्त्रांविषयी कुतूहल असते. त्यांना आधुनिक शास्त्रासोबत संरक्षण साहित्य जवळून पाहण्याची ही संधी आहे.



**पुणे : इंटरनॅशनल एक्झिबिशन ॲण्ड कन्व्हेनशन सेंटर, मोशी येथे 'महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो'च्या पूर्वतयारीची पाहणी करताना उद्योगमंत्री उदय सामंत**

संरक्षण अभियांत्रिकी उद्योगांनाही प्रदर्शनात सहभागी करून घेण्यात येणार आहे. या क्षेत्राशी संबंधित स्टार्ट अप्स आणि इतर उद्योगांना उद्योग विस्तार आणि या क्षेत्रातील संधीविषयी प्रदर्शनातून माहिती मिळणार असल्याने उद्योग क्षेत्राशी निगडित प्रतिनिधींनी प्रदर्शनात सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री.सामंत यांनी केले. प्रदर्शनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या एमएसएमईना निःशुल्क दालन उपलब्ध करून द्यावे. सर्व उद्योग संघटनांच्या बैठका घेऊन त्यांना आमंत्रित करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. प्रदर्शनातील चार दालनांना शिवनेरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पन्हाळा असे नाव देण्यात येणार आहे. संपूर्ण परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांच्या संरक्षण सिद्धतेची संकल्पना प्रदर्शित करण्यात येणार आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील १ लाखाहून अधिक विद्यार्थी या प्रदर्शनाला भेट देणार आहे. त्यांना १ हजार प्रकारचे तंत्रज्ञान पाहण्यासोबत भारतीय सुरक्षा दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# मातंग समाजाच्या समस्यांबाबत सामाजिक न्याय विभाग सकारात्मक : सुमंत भांगे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील मातंग समाजाच्या समस्यांबाबत सामाजिक न्याय विभाग सकारात्मक असून या समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल, अशी ग्वाही सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांनी मातंग समाजाच्या शिष्टमंडळाला दिली.



**मुंबई : मातंग समाजाच्या समस्यांबाबत सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांना निवेदन देताना मातंग क्रांती महामोर्चाचे पदाधिकारी**

मातंग क्रांती महामोर्चा शिष्टमंडळाने श्री. भांगे यांची नुकतीच भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. त्यावेळी आयोजित बैठकीत श्री. भांगे यांनी शिष्टमंडळास आश्वासित केले.

मातंग क्रांती महामोर्चा शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेची निर्मिती करणे, जातीनिहाय जनगणना करणे, मातंग समाजाला वेगळे आठ टक्के आरक्षण देणे, अण्णाभाऊ साठे स्मारक (चिराग नगर) याची लवकर निर्मिती करणे, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील कर्जासाठीच्या जाचक अटी कमी करणे, क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करणे, क्रांतीसम्राट डॉ. बाबासाहेब गोपले यांचे फोटो अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या सर्व कार्यालयात लावणे या मागण्याचा समावेश आहे.

यावेळी बार्टीचे महासंचालक सुनील वारे , हिंदुस्थान ॲग्रो चे अध्यक्ष डॉ.ढोकणे पाटील, शिष्टमंडळातील सदस्य अशोक ससाणे, मोहनराव तुपसुंदर, सुदाम आवाडे, राजेंद्र साठे, देवेंद्र खलसे, सुनिता तुपसुंदर, श्रावण नाटकर, शामराव सकट, दिलीप कसबे, राजेश पवार, नानाभाऊ पाटोळे, अनिल साठे, श्रीमती छबुबाई सूर्यवंशी आदी उपस्थित होते. मातंग समाजाच्या संघटनेच्या वतीने आझाद मैदान मुंबई येथे दि. १८ जानेवारी २०२४ रोजी समाजाच्या अनेक प्रलंबित मागण्यासाठी मोहनराव कांबळे यांनी आमरण उपोषण केले होते. सामाजिक न्याय विभागाच्या विनंतीवरून त्यांनी उपोषण मागे घेतले होते. त्याअनुषंगाने शिष्टमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

# कांदा निर्यातीवरील बंदी हटवली : भारती पवार

माणदेश एक्सप्रेस न्युज

नवी दिल्ली : केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. देशांतर्गत उपलब्धता वाढवणे आणि किमती नियंत्रणात राहण्याच्या उद्देशाने सरकारने हा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार ३१ मार्चपर्यंत बंदी कायम राहणार होती. मात्र लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कांदा निर्यातीचा निर्णय मागे घेतला आहे. केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी या निर्णयाची माहिती माध्यमांना दिली. या निर्णयाची अधिकृत सूचना लवकरच सरकारकडून काढण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ही निर्यातबंदी उठवली असल्याचे सांगितले जाते. मागच्या काही दिवसांपासून महाराष्ट्रासह देशाच्या इतर भागातील शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण होते. महाराष्ट्रातील सरकार आणि भाजपामधील अनेक नेत्यांनी अमित शाह यांची भेट घेऊन कांद्यावरील निर्यातबंदी उठवावी, अशी मागणी करण्यात



आली होती. या मागणीला आता यश मिळाल्याचे सांगितले जाते.

केंद्र सरकारने निर्यात बंदीचा निर्णय घेतल्यामुळे कांद्याचे दर गडगडले होते. त्याचे स्थानिक पातळीवर तीव्र पडसाद उमटले. आंदोलनेही झाली. दुधाला जाहीर केलेले दरही मिळत नाहीत. अन्य कृषिमालाबाबत वेगवेगळ्या अडचणी होत्या. यामुळे शेतकरी वर्गात प्रचंड नाराजीचे वातावरण होते. दिल्लीच्या सीमेवर शेतकरी हमीभावाच्या मागणीसाठी आंदोलन करत असताना देशातील विविध भागातील शेतकऱ्यांची नाराजी कमी व्हावी, असा प्रयत्न या निर्णयातून झालेला दिसत आहे.

# माझ्या रक्तात काँग्रेस आहे, माझे तत्व अन् विचार : प्रणिती शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** काँग्रेस नेत्या प्रणिती शिंदे या भाजपसोबत जाणार असल्याच्या चर्चेला अखेर प्रणिती शिंदे यांनीच पूर्णविराम दिला आहे. माझी तत्व आणि विचार हे काँग्रेसचे आहेत. त्यामुळे मरेपर्यंत मी काँग्रेस सोडणार नाही. माझ्या रक्तात काँग्रेस आहे. पक्षातून इतर पक्षात गेलेल्या नेत्यांना परत आणण्याची क्षमता काँग्रेसमध्ये आहे. उलट आम्ही भाजपला संपवू असं म्हणत त्यांनी भाजपसोबत जाण्याच्या चर्चेच खंडन करत टीका केली. प्रणिती शिंदे या लोणावळ्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या. काँग्रेसच्या राष्ट्रीय शिबिराचा आजचा दुसरा दिवस आहे.

काँग्रेस नेत्या प्रणिती शिंदे म्हणाल्या, काँग्रेस जिथे जिथे लढेल तिथं आम्ही जिंकणार. भाजपच्या राजकारणाला लोक कंटाळले आहेत. भाजप इतर नेत्यांवर दबाव टाकत आहे. या सर्व गोष्टींना नागरिक कंटाळले आहेत. त्यांना आता सक्षम पर्याय हवा आहे. त्या पुढे म्हणाल्या. भाजपच्या वाटेवर कोणीही नाही. जे गेले त्यांना काही पर्याय नव्हता. भाजप त्यांना मानसिकरित्या त्रास देत होते. नांदेडचे अनेक लोक आमच्यासोबत आहेत. तीच खरी काँग्रेस आहे. पुढे त्या म्हणाल्या, किती आले- गेले तरीही काँग्रेस मजबूत आहे. या शिबिरात सर्व आमदार, काँग्रेस पदाधिकारी आले आहेत. कोणी कुठे जाणार नाही. कुणावर तेवढा ईडी चा दबाव नाही. सोलापूर लोकसभा लढवणार का? या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या, काँग्रेस पक्ष लोकसभेची तयारी करीत आहे.

# तर आम्हाला तोंड दाखवायलाही जागा उरणार नाही : रामदास आठवले

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी युती आणि आघाडीतील अनेक घटकपक्षांमध्ये जागावाटपाची चर्चा चालू झाली आहे. इंडिया आघाडी विरुद्ध एनडीए अशी ही लढत असणार आहे. युती आणि आघाडीत जवळपास प्रत्येकी २०-२५ मित्रपक्ष आहेत. त्यामुळे या सर्व मित्रपक्षांमध्ये जागा वाटप करणं आव्हानात्मक ठरणार आहे. तसंच, एनडीएतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) या पक्षानेही आता एका जागेची मागणी केली आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्याची मागणी रामदास आठवले यांनी केली आहे.

रामदास आठवले म्हणाले, सरकारला सूचना करण्याचा अधिकार विरोधकांना आहे. मात्र मोदी हटावची मोहिम इंडिया आघाडीने आखली आहे. परंतु, मोदींना हटवणं येरागबाळ्याचं काम नाही. १९९२ मध्ये भाजपाचे दोनच खासदार होते, परंतु आता २०२४ मध्ये ३७० पेक्षा जास्त खासदार निवडून येतील. तर एनडीएचे ४०० पेक्षा जास्त सदस्य निवडून येतील.

लोकसभेच्या निवडणुकीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची युती आहे. या मुख्य ताकदीला मदत



**रामदास आठवले**

करणारी आरपीआयची छोटी ताकद आहे. निवडून आणण्यासाठी काही मतांची गरज असते, ती जबाबदारी आरपीआयची आहे. त्यामुळे नेत्यांना नम्र विनंती आहे, की मी राज्यसभेचा खासदार असलो तरीही मी लोकसभेचा माणूस आहे. यामुळे रिपब्लिकन पक्षाला जागा देणं आवश्यक आहे, अशी मागणी रामदास आठवलेंनी केली.

देशभरातील लोक मला विचारत आहेत. आरपीआयला शिर्डीतून एक जागा द्यावी. येथून आरपीआयचा उमेदवार जिंकून यावा अशी देशभरातील लोकांची मागणी आहे. शिर्डीतील लोकांचीही ही भावना आहे. मी तिथून निवडून आलो तर मोदींच्या मंत्रिमंडळात मला नक्कीच संधी मिळेल. त्या मंत्रिपदाचा मी उपयोग करेन. शिर्डी लोकसभेचा कायापालट करेन, न्याय देण्याचं काम मी मंत्रिपदाच्या माध्यमातून करू शकेन. त्यामुळे एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांना विनंती आहे की, लोकांच्या भावनांचा आदर राखणं गरजेचं आहे. आम्हाला एकतरी जागा मिळावी. आम्हाला एकही जागा मिळाली नाहीतर आम्हाला तोंड दाखवणं अवघड होऊन जाईल. दलित मतं ट्रान्सफर करायची असतील तर आरपीआयला जागा द्यावी, अशी साद रामदास आठवलेंनी घातली आहे.



# भारतातील कला संस्कृती हा अमूल्य ठेवा

## डॉ. इंदूजी नायर : स्वेरीत 'स्पीक मॅके' तर्फे केरळचा 'कोडीयट्टम' कार्यक्रम संपन्न



पंढरपूर : स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये 'स्पीक मॅके' तर्फे केरळच्या 'कोडीयट्टम' कार्यक्रमाचे उदघाटन करताना केरळ मधील नाट्य संस्थेच्या प्रमुख डॉ.इंदूजी नायर सोबत डावीकडून स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, डॉ. इंदूजी नायर, सेवानिवृत्त पशु वैद्यक अधिकारी डॉ. विश्वासराव मोरे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे तसेच एका थरारक कला सादर करताना कलावंत मार्गी मधु व उपस्थित विद्यार्थी.

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पंढरपूर :** 'भारताच्या विविध भागातील भाषा, संस्कृती, कलाप्रकार, खाद्य हे सर्व वेगवेगळे असताना भारतीयांनी मात्र आपल्या संस्कृती व परंपरांचे खुप सुंदररीत्या जतन केले आहे. आपल्या भागात एखादा पाहुणा आला तर आपण त्यांचे स्वागत आपल्या अंगीकृत कलाप्रकाराने करतो. त्यामुळे भारताची कला संस्कृती हा एक अमूल्य ठेवा आहे आणि त्याचे खूप कौतुक वाटते.' असे प्रतिपादन केरळ मधील नाट्य संस्थेच्या प्रमुख डॉ. इंदूजी नायर यांनी केले.

अलीकडच्या काळात, मोबाईलच्या युगात युवावर्ग व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. यामुळे जुनी परंपरा, कला नृत्य अविष्कार, गायन, संगीत, पारंपारिक वेशभूषा, लोकभूषा, आपसातील संवाद हे कमी होत चालले आहेत. यामुळे पाश्चात्य कला संस्कृती देखील जवळपास लोप पावत चालली आहे. त्यामुळे येणाऱ्या पिढीला हे सर्व कलाप्रकार एका बंदीस्त चित्रातच पहायला मिळणार आहेत असे वाटते. असे असताना स्वेरीमध्ये नुकताच 'स्पीक मॅके'च्या माध्यमातून 'कोडीयट्टम' हा दक्षिणात्य कलाप्रकार सादर करण्यात आला. याला विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व 'स्पीक मॅके' यांच्या संयुक्त विद्यमाने केरळ भागातील पुरातन संस्कृत नाटक असलेल्या 'कल्याण सौगंधी' या नाटकातील 'कोडीयट्टम' हा कला प्रकार केरळच्या मुरब्बी कलावंतांनी मुक नृत्याद्वारे सादर करून विद्यार्थ्यांच्या टाळ्या मिळविल्या. 'स्पीक मॅके' चा समूह भारतीय संस्कृतीचा सर्वांगीण विकास करण्याचे कार्य करत आहे. विद्यार्थ्यांना भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य, कला आणि साहित्याच्या सार्थक अनुभवाचे संवर्धन करणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर 'स्पीक मॅके' च्या वतीने स्वेरीत 'कोडीयट्टम' या कलाप्रकाराचे आयोजन केले होते.

यावेळी 'केरळ' मधील नाट्य संस्थेच्या प्रमुख डॉ. इंदूजी नायर हया भारतीय संस्कृतीचे मनसोक्त कौतुक करत होत्या. प्रारंभी स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी केरळहून आलेल्या कलावंतांचे स्वागत केले. नाट्य संस्थेच्या प्रमुख डॉ. इंदूजी नायर कोडीयट्टम या नृत्यकलेचे महत्त्व सांगताना पुढे म्हणाल्या की, 'कोडीयट्टम' हे एक प्राचीन भारतीय लोकनृत्य असून ज्याचा मुख्य स्रोत केरळ राज्यातील 'कुट्टनाड' आहे. या नृत्य प्रकारात पौराणिक कथा, संस्कृत भाषेत नाटय आणि नृत्य स्वरूपात सादर केली जाते.' 'कोडीयट्टम' चे प्रमुख सांगितीक वाद्य कुंजियाटम, कुझित्ताळं, एतक्का, कुरूंकुझल आणि शंख याचा वापर केला जातो.' असे सांगून 'कोडीयट्टम' नृत्यकलेबद्दलचे महत्त्व सांगितले. मार्गी मधु यांनी 'कोडीयट्टम' नृत्याचे जबरदस्त सादरीकरण केले. चेहऱ्यावरील हावभाव, मुकपट यांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना उत्तम कला प्रकाराचे दर्शन दिले. पद्मभूषण पुरस्कार प्राप्त अम्मानूर माधव चकियार आणि त्यांचे वडील मझिक्कलूम कोचुकुत्तम यांच्याकडून मार्गी मधु यांनी ही सुंदर कला आत्मसात केली आहे. त्यांनी वेशभूषा आणि हात-पायांच्या अजब हालचालीद्वारे मुकपट सादर केला. या नाट्य प्रकाराला जितेश पी. चकियार, बी.एस.मणीक नंदन आणि राजन यांनी सुमधुर वाद्य, केरळा ढोलकी, तबला वाजवून समर्पक अशी साथ दिली तर श्रीजीत यांनी वेशभूषेचे काम पाहिले. केरळचे कलावंत मार्गी मधु यांच्या लक्षवेधी नृत्याने, वन्यप्राण्यांच्या सुक्ष्म हालचालीचे परीक्षण करून केलेले नृत्य पाहून स्वेरीचे विद्यार्थी भारावून गेले. यावेळी सेवानिवृत्त पशुवैद्यक अधिकारी डॉ. विश्वासराव मोरे, सर्व प्राचार्य, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. करण पाटील यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन सोनाली करवीर यांनी केले तर संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी केरळच्या कलावंतांनी सादर केलेल्या कलेचे कौतुक करून पश्चात कला संस्कृतीचे जतन करणे आवश्यक असल्याचे सांगून उपस्थितांचे आभार मानले.

# लोकमंगल सामाजिक संस्थेतर्फे जनावरांच्या औषधांचे मोफत वाटप




म्हसवड : लोकमंगल सामाजिक सेवाभावी संस्था व आयुष मेडिकल्स यांच्या वतीने जनावरांच्या मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** कुकुडवाड येथील लोकमंगल सामाजिक सेवाभावी संस्था व आयुष मेडिकल्स यांचे संयुक्त विद्यमाने पंचक्रोशीतील पशुपालकांसाठी मदतीचा हात म्हणून सर्व प्रकारच्या जनावरांच्या औषधांचे मोफत वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास भाजप युवा मोर्चाचे सातारा जिल्हाध्यक्ष अध्यक्ष चिन्मय कुलकर्णी, संस्थेचे अध्यक्ष वैभव कुंभार यांच्यासह कुकूडवाड गावचे सरपंच संजय जाधव, माजी सरपंच बाळासाहेब काटकर, ग्रामविकास अधिकारी श्री. देवकर, तलाठी दिपक आचार्य, डॉ. गजानन जाधव, डॉ. किरण कुंभार, संस्थेचे खजिनदार डॉ.उषा कुंभार, सचिव शुभांगी कुंभार डॉ. सचिन वाघमारे, डॉ. बिराजी कारंडे, डॉ. ऋतुराज राजेघाटगे, नैसर्गिक शेतीतज्ञ भास्कर शेठ देशमुख, ग्रामपंचायत सदस्य मनोज काटकर, सुधाकर काटकर, श्रीमंत काटकर व पशुपालक शेतकरी बांधव उपस्थित होते.

# दहावी व बारावी परीक्षा केंद्राच्या ठिकाणी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कोल्हापूर विभागीय मंडळ कोल्हापूर यांच्यामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) दिनांक २१ फेब्रुवारी २०२४ ते दिनांक १९ मार्च २०२४ तसेच माहिती तंत्रज्ञान (ख.ढ.) व सामान्य ज्ञान (ऋघ.) या विषयाची ऑनलाईन परीक्षा दिनांक २० मार्च २०२४ ते २३ मार्च २०२४ व माध्यमिक शालान्त (इयत्ता १०वी) प्रमाणपत्र परीक्षा दिनांक १ मार्च २०२४ ते दिनांक २६ मार्च २०२४ या कालावधीत होणार आहे. ही परीक्षा इयत्ता १२ वी साठी जिल्ह्यातील एकूण ५१ परीक्षा केंद्रावर व इयत्ता १० वी साठी एकूण १०३ परीक्षा केंद्रावर होणार आहे. परीक्षा केंद्राच्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी परीक्षा केंद्राच्या ठिकाणी इमारतीपासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरात अनुक्रमे दि. २१ फेब्रुवारी २०२४ ते २३ मार्च २०२४ व दि. १ मार्च २०२३ ते दि. २६ मार्च २०२४ या कालावधीसाठी सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू केले असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

आदेशात म्हटले आहे, परीक्षा वेळेत परीक्षेसंबंधी अधिकारी / कर्मचारी व परीक्षेस येणारे विद्यार्थी वगळता इतर कोणत्याही चार किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना परीक्षा केंद्राच्या ठिकाणी फिरण्यास, एकत्रित गटागटाने फिरणे व उभा राहण्यास मनाई केली आहे. तसेच परिक्षा केंद्राच्या परिसरातील झेरॉक्स मशिन, पब्लिक टेलिफोन बुथ, फॅक्स मशिन, ध्वनीक्षेपक यांचा परिक्षा संदर्भात कोणत्याही गैरप्रकारासाठी वापरण्यास मनाई केली असून परिक्षा केंद्रात मोबाईल, पेजर नेण्यास मनाई केली आहे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

# सांगलीत दोघा तरुणाकडून चोरीचे १७ मोबाईल हस्तगत




सांगली : मोबाईल चोरी करणारे आरोप तसेच जप्त करण्यात आलेले मोबाईल व तपास करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** मिरजेतील दोन तरूणांना गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलीसांनी संशयावरून पकडून झाडाझडती घेतली असता त्यांच्याकडे सव्वा लाखाचे चोरीचे १७ भ्रमणध्वनी आढळून आले. गर्दीच्या ठिकाणी बेमालूमपणे भ्रमणध्वनी लंपास करत असल्याची कबुली अटक केलेल्या दोघांनी दिली असल्याचे पोलीस निरीक्षक अरूण सुगावकर यांनी शनिवारी सांगितले.

याबाबत मिळालेली माहिती अशी, गुन्हे प्रकटीकरण विभागाचे सहायक निरीक्षक विक्रम पाटील यांना संशयित मिरज बस स्थानक परिसरात येत असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यांनी सापळा लावून अहमदअली जमीर शिकलगार (वय २० रा.इदगाहनगर) आणि वसीम उर्फ आबु बादशाह सुभेदार (वय १९ रा.संजय गांधी नगर झोपडपट्टी) या दोघांना ताब्यात घेउन झडती घेतली असता त्यांच्याकडे चोरी केलेले १७ भ्रमणध्वनी आढळून आले. या चोर्या त्यांनी मिरज शहर व इदगाह नगर परिसरात केल्याची कबुली दिली आहे.

# तिसऱ्या कसोटीत भारताचा दिमाखदार विजय



राजकोट : द्विशतकवीर यशस्वी जैयस्वाल फटका मारताना

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**राजकोट :** राजकोटमध्ये सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्याचा आज चौथा दिवशीच टीम इंडियाने इंग्लंडला चारीमुंड्या चीत केले. तब्बल ४३४ धावांनी पराभव करत पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. या सामन्यात भारताने आपला दुसरा डाव ४३०/४ धावांवर घोषित केला. यानंतर इंग्लंडला ५५७ धावांचे लक्ष्य दिले. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडचा दुसरा डाव १२२ धावांवर आटोपला. भारताने ४३४ धावांनी दिमाखदार विजय मिळविला. सामन्यामध्ये कर्णधार रोहित शर्माचे दमदार शतक, जडेजाची ११२ धावांची धडाकेबाज खेळी, दुसऱ्या डावात जैस्वालचे द्वीशतक, गिल ९१ धावा सर्फराजचे दोन्ही डावातील अर्धशतकाच्या जोरावर भारताने या सामन्यावर पकड मजबूत केली. पहिल्या डावात सिराजचा भेदक मारा तर, दुसऱ्या डावात जडेजा- कुलदीपच्या फिरकीच्या जोरावर भारताने इंग्लंडचा नामुष्कीजनक पराभव केला.

राजकोटमध्ये झालेल्या या सामन्यात इंग्लंडला ५५७ धावांचे लक्ष्य मिळाले होते. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ १२२ धावांवर गारद झाला. मार्क वुड वगळता इंग्लंडच्या एकाही फलंदाजाला २० चा आकडाही गाठता आला नाही. वुडने १५ चेंडूत ३३ धावा केल्या. त्याचवेळी भारताकडून रवींद्र जडेजाने पाच विकेट घेतल्या. याशिवाय कुलदीपला दोन बळी मिळाले. बुमराह आणि अश्विनला प्रत्येकी एक विकेट मिळाली. पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताने २-१ अशी आघाडी घेतली आहे.

हैदराबादमधील पहिली कसोटी इंग्लंडने जिंकली, तर विशाखापट्टणममधील दुसरी कसोटी भारताने जिंकली. राजकोटमध्ये नाणेफेक जिंकून भारताने प्रथम फलंदाजी करत ४४५ धावा केल्या. त्याचवेळी इंग्लंडचा पहिला डाव ३१९ धावांवर संपला. पहिल्या डावाच्या आधारे भारताकडे दुसऱ्या डावात १२६ धावांची आघाडी होती. भारताने ४ बाद ४३० धावा करून दुसरा डाव घोषित केला. एकूण आघाडी ५५६ धावांची झाली. ५५७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लिश डाव १२२ धावांवर आटोपला. मालिकेतील चौथा सामना २३ फेब्रुवारीपासून रांची येथे खेळवला जाणार आहे.

जैस्वालचे 'अभूतपूर्व' यश

इंग्लंडविरूद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यात भारताच्या यशस्वी जैस्वालने अनोख्या पराक्रम आपल्या नावावर केला. जैस्वालने इंग्लंडविरूद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात द्विशतक झळकावले होते. यानंतर त्याने मालिकेतील तिसऱ्या सामन्यातही धडाकेबाज द्विशतकी खेळी केली.एकाच कसोटी मालिकेत दोन द्विशतके झळकवण्याच्या पराक्रम त्याने केला आहे. या खेळीत त्याने २३१ चेंडूमध्ये १४ चौकार आणि १० षटकार लगावले. या शानदार खेळीसह त्यान सर्फराज खानसोबत पाचव्या विकेटसाठी १४० धावांची भागिदारी केली.

